डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' -- संपादक :- शाहू संभाजी भारती (वर्ष तिसरे - अंक ०७०) मंगळवार दि.१४/१२/२०२१ पान ०५

## पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार (माजी केंद्रीय कृषीमंत्री) यांच्या वाढदिवसानिमित्त

# पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी शेक्षणिक संकुलांमध्ये वृक्षारोपण

पुणे : दि.१३ ( रयतेचा कैवारी, ऑनलाइन वृत्तसेवा ) पद्मविभूषण मा. शरदचंद्रजी पवार (मा. केंद्रीय कृषी मंत्री ) यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रातील अग्रगण्य शिक्षण संस्था पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वतीने ६ ते १८ डिसेंबर या कालावधीमध्ये विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाअंतर्गत पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शैक्षणिक संकुलामध्ये वडगाव शेरी मतदार संघाचे मा आमदार श्री बापूसाहेब पठारे, पुणे महानगरपालिकेचे सन्माननीय नगरसेवक मा महेंद्र पठारे, मा संजीलाताई पठारे , मा सुमनताई पठारे, सामाजिक कार्यकर्ते मा सुरेंद्र पठारे आणि वडगाव शेरी येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे युवा अध्यक्ष श्री किरण खैरे यांच्या शुभहस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला.

शरदचंद्रजी पवार यांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा या सर्व क्षेत्रांमध्ये योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे व



त्यामधून आपणांस नेहमीच प्रेरणा मिळते असे प्रतिपादन करून त्यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा मा. आमदार श्री बापूसाहेब पठारे यांनी याप्रसंगी दिल्या.

शरदचंद्रजी पवार यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विद्यार्थी व शिक्षक यांच्या गुणवत्तावाढीसाठी व त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी संस्थेने ६ ते १८ डिसेंबर या कालावधीत ई - कन्टेन्ट डेव्हलपमेंट, ई-पोस्टर प्रेझेंटेशन, राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा, काव्यलेखन स्पर्धा, शरदचंद्रजी पवार साहेबांना शुभेच्छा पत्र लेखन स्पर्धा, प्रश्नमंजुषा, सायकलिंग, विज्ञान प्रदर्शन, निबंध स्पर्धा, सूर्यनमस्कार हे विविध उपक्रम व स्पर्धांबरोबरच तज्ञ मान्यवरांची ऑनलाइन 'शारदा व्याख्यानमाला' देखील आयोजित करण्यात आली आहे असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मा व्यवस्थापन सदस्य व फार्मसी महाविद्यालय प्राचार्य डॉ अशोक भोसले यांनी सांगितले.या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाप्रसंगी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी शिक्षण संकुला मधील पदविका फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य ॲड सचिन कोतवाल, कै. तुकाराम धोंडिबा पठारे महाविद्यालय प्राचार्या सौ जयश्री जावीर, इंग्लिश स्कूल प्राचार्या सौ अरुणा व शिल्पा खांडरे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन फार्मसी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा सुजित काकडे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा अश्विनी बनकर यांनी व्यक्त केले.